**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – इमरान रज्ज़ाक खान साटविलकर, वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – रहाटेश्वर, कालवीवाडी

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र.सहा.सरकारी अभियोक्ता श्री.ए.ए. गुमास्ते यांचे मार्फत.</u>**

०१. दि.२६/०२/२०२२ रोजी मी माझ्या बागेत असताना रहाटेश्वर गावच्या सरपंच यांचा मला फोन आला की, ताम्हणकर यांच्याकडे मारामारी झाली आहे, त्यामुळे तेथे जाऊन या. मी तंटामुक्ती अध्यक्ष असल्यामुळे मला फोन आला होता. दुपारी ४.३० ते ५.०० च्या दरम्यान संदिप ताम्हणकर यांच्या घरी चर्मकारवाडी येथे गेलो. तेथे पंचनामा चालू होता. पंचनामा झाल्यानंतर पोलिसांनी मला सही करायला सांगितली. त्यामुळे मी तंटामुक्ती अध्यक्ष या नात्याने पंचनाम्यावर सही केली. पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता. आता मला दि.२६/०२/२०२२ रोजीचा पंचनामा दाखवला. तो पोलिसांनी माझ्या समक्ष लिहीला नव्हता. त्यावर माझी अ.क्र.२ ची सही आहे. सहीस **नि.क्र. ४६** देण्यात येते.

**<u>आरोपी अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहा सरकारी वकील यांनी मे. कोर्टास आरोपीस सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली.</u>**

०२. हे खरे नाही की, दि.२६/०२/२०२२ रोजी मला पोलिसांनी राजेंद्र ताम्हणकर यांच्या घरी घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे खरे की, मी राजेंद्र ताम्हणकर यांच्या घरी गेलो होतो. हे खरे की, त्यावेळी तेथे पोलीस होते. हे खरे की, सरिता ताम्हणकर यांनी मला पोलिसांसमक्ष घटना काय घडली ते सांगितले होते. हे खरे की, पोलिसांनी त्यानंतर मला घटनास्थळ दाखवले. हे खरे की, घटनास्थळ राजेंद्र ताम्हणकर यांच्या सामाईक घरातील होते. हे खरे की, सदरचे घर कौलारु आहे. हे खरे की, या घरामध्ये बारा ते पंधरा फुटाची पडवी आहे. हे खरे की, या पडवीमध्ये त्यांना मारहाण झाल्याचे फिर्यादि सांगत होत्या. या घराचा घर क्र.२७३ अ–१ असा आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. पडवीलगत न्हानी घर आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. घराच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. या घराचे दोन घर नंबर असल्याचे पोलिसांनी मला सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. हे खरे नाही की, माझ्या समक्ष पुर्ण पंचनामा झाला नाही.

सरतपास पूर्ण

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. के.के.मराठे यांचे मार्फत.</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. ०७/११/२०२४